आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२१ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उद्या अधिसूचना प्रसिद्ध होणार, झारखंडमध्येही उद्यापासून दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज भरता येणार
- काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची नवी दिल्लीत बैठक, महाविकास आघाडीत ३०-४० जागांबाबत तिढा कायम
- विमानाच्या वाहतुकीवर परिणाम करणाऱ्या फसव्या कॉलचा दखलपात्र गुन्ह्यात समावेश करण्याचा केंद्र सरकारचा विचार
- पूर्व लडाखमध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गस्त घालण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात करार

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या ब्रिक्स परिषदेसाठी रशियाला रवाना होणार

**<><><><><>**

राज्य विधानसभा निवडणुकीसाठी अधिसूचना उद्या प्रसिद्ध होणार असून त्यासोबतच अर्ज भरायला सुरुवात होणार आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. या अर्जांची छाननी ३० ऑक्टोबरला होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होईल. नांदेड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूकही याच वेळापत्रकाप्रमाणे होणार आहे.

राज्यात २८८ पैकी २५ मतदारसंघ अनुसूचित जाती आणि २९ अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. मतदार यादीत आतापर्यंत ९ कोटी ६३ लाखांहून अधिक मतदारांची नोंद झाली आहे. त्यात सुमारे ५ कोटी पुरुष आणि ४ कोटी ६६ लाखांहून अधिक महिला आहेत. सुमारे १ कोटी ८५ लाख हे २० ते २९ वयोगटातले मतदार आहेत. २० लाख ९३ हजारांहून अधिक मतदारांनी यंदा पहिल्यांदाच मतदारयादीत नाव नोंदवलं आहे. राज्यात विधानसभेसाठी एकूण १ लाख १८६ मतदार केंद्र असतील. त्यातले ४२ हजार ६०४ शहरी आणि ५७ हजार ५८२ ग्रामीण भागात आहेत. सर्वाधिक ८ हजार ४१७ मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात तर सर्वात कमी ९२१ मतदान केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत.

**<><><><><>**

राज्यात उद्यापासून उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात होणार असली तरी महायुती आणि महाविकास आघाडीतलं जागावाटप अजून स्पष्ट झालेलं नाही. भाजपाचे ९९ उमेदवार आणि अजित पवारांचे काही उमेदवार वगळता एकाही मोठ्या पक्षानं उमेदवार जाहीर केलेले नाहीत. वंचित बहुजन आघाडीनं ८३ उमेदवार जाहीर केले आहेत. परिवर्तन महाशक्तीचे १०, मनसेचे २ उमेदवार आतापर्यंत जाहीर झाले आहेत. MIM, समाजवादी पक्ष यांनीही काही उमेदवार जाहीर केले आहेत.

**<><><><><>**

झारखंडमधल्या विधानसभा निवडणुकीतल्या दुसऱ्या टप्प्यातल्या ३८ जागांसाठीही उद्या अधिसूचना जाहीर होणार आहे. इथंही महाराष्ट्राप्रमाणेच अर्ज भरणं आणि मतदानाचं वेळापत्रक आहे.

झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यातले अर्ज भरायची सुरुवात १८ तारखेलाच झाली असून अंतिम मुदत शुक्रवारपर्यंत आहे. पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

<><><><><>

काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक आज नवी दिल्लीत झाली. यावेळी महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकांविषयी चर्चा झाली. राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी, के. सी. वेणुगोपाल यांच्यासह राज्यातले नेते उपस्थित होते. २५ तारखेला छाननी समितीची आणखी एक बैठक होईल, त्याच दिवशी अंतिम निर्णय होईल, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बैठकीनंतर दिली.

<><><><><>

महाविकास आघाडीत ३० ते ४० जागांवर सहमती शिल्लक असून त्यावर उद्या मुंबईत शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा करणार असल्याचं काँग्रेसनं आज जाहीर केलं. काँग्रेसची ९६ जागांवरची चर्चा पूर्ण झाली आहे. उद्याच्या चर्चेनंतर उमेदवारांची यादी जाहीर करण्याचा प्रयत्न असेल, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं. नवी दिल्लीत ते वार्ताहरांशी बोलत होते. शिवसेना आघाडीतून बाहेर पडणार या बातम्यात काहीही तथ्य नाही, भारतीय जनता पक्ष जाणीवपूर्वक विरोधी पक्षांबद्दल गैरसमज पसरवण्याचे प्रयत्न करत आहे, असा आरोप त्यांनी केला. पराभवाच्या भितीने भाजपा अशी खेळी करत आहे.

काँग्रेसकडूनही अशा पद्धतीचे कोणतेही विधान केलेले नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

संयुक्त जनता दलाने झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी जमशेदपूर पश्चिम आणि तमार मतदारसंघासाठी दोन उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. तर लोकजनशक्ती पक्ष (रामविलास) ने छत्रा विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवाराच्या नावाची घोषणा केली आहे. झारखंड विधानसभेसाठी पहिल्या टप्प्यातलं मतदान १३ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात **उद्या ठाणे** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

अमली पदार्थांचा व्यापार, सायबर गुन्हेगारी, दहशतवाद यासारखी संकटं देशाच्या जवानांच्या दृढ निश्चयाचा सामना करू शकत नाहीत असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत राष्ट्रीय पोलीस स्मारक इथं पोलीस स्मृती दिनानिमित्त हुत्मात्यांना शहा यांनी आदरांजली वाहिली, त्यावेळी ते बोलत होते.

सुरक्षा दलांची कार्यक्षमता आणि समर्पण यामुळे गेल्या दशकभरात देशात शांतता प्रस्थापित करण्यात यश आलं आहे, असंही शहा म्हणाले.

नुकतेच लागू करण्यात आलेल्या तीन नव्या फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी संपूर्ण देशभरात झाल्यानंतर भारतात जगातली सर्वात आधुनिक गुन्हेगारीविरोधी न्याय व्यवस्था स्थापित होईल, कोणत्याही गुन्ह्यात केवळ तीन वर्षात न्याय मिळेल, असंही अमित शहा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विमानाच्या वाहतुकीवर परिणाम करणाऱ्या फसव्या कॉलच्या धोक्याचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी सरकार सक्रिय पावले उचलत आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालय फसव्या कॉलवर कायदेशीर कारवाई करण्याच्या विचारात असल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू किंजरापू यांनी म्हटले आहे. यासंदर्भात कायद्यात दुरुस्ती करुन फसव्या कॉलला दखलपात्र गुन्हा बनविण्याचा विचार करत आहे, असंही ते यावेळी म्हणाले. उडान योजनेला ८ वर्षे पूर्ण झाली आहेत. आणखी १० वर्षांसाठी ही योजना सुरू ठेवण्याचा सरकारचा विचार आहे. त्यात आणखी ५० विमानतळ सुरू करण्याची किंवा सध्याच्या विमानतळांची क्षमता वाढवण्याची योजना असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत ५ नक्षली ठार झाले. या चकमकीत एक पोलीस जखमी झाला असून त्याच्यावर गडचिरोली इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विधानसभा निवडणुकीत

घातपाताचा कट रचण्यासाठी कोपर्शीच्या जंगलात नक्षलवादी एकत्र आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे या भागात सी-६० पथकाच्या २२ तर केंद्रीय राखीव दलाच्या २ तुकड्यांनी नक्षलविरोधी अभियान राबवलं. या दरम्यान झालेल्या चकमकीत पाच नक्षलवादी ठार झाले असून त्यांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे.

<><><><><>

लडाखमधल्या पूर्व भागातल्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गस्त घालण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात करार झाला आहे. या करारामुळे २०२०मध्ये सुरू झालेला दोन्ही देशांमधला तणाव निवळू शकतो, असं परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना म्हणाले. दोन्ही देशांमध्ये याबाबत सविस्तर चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला, असंही ते म्हणाले. तसंच, रशियन सैन्यात लढलेल्या भारतीयांच्या परत येण्याविषयीही मिस्त्री यांनी माहिती दिली. रशियातून ८५ भारतीय मायदेशी परतले आहेत आणि जवळपास २० जण अजूनही तिथेच असून या संदर्भात भारतीय दूतावासाचे अधिकारी रशियाच्या उच्चाधिकाऱ्यांशी संपर्क साधत आहेत, असं ते म्हणाले.

<><><><><>

व्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून रशियाला जाणार आहेत. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतिन यांच्या निमंत्रणावरून मोदी रशियाला भेट देत आहेत. जागतिक विकास आणि सुरक्षिततेसाठी बहुपक्षीयता मजबूत करण हा या शिखर परिषदेचा विषय आहे. भारत

हा ब्रिक्सचा संस्थापक सदस्य असून ब्रिक्स स्थापनेपासून भारत सर्व उपक्रमांमध्ये सहभागी झाला असल्याचं परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी प्रधानमंत्र्यांच्या रशिया दौऱ्याविषयी माहिती देताना सांगितलं. तसंच आर्थिक वाढ, शाश्वत विकास आणि जागतिक प्रशासन सुधारणा यासारख्या क्षेत्रांमध्ये ब्रिक्सनं केलेल्या प्रयत्नांमध्ये भारतानं दिलेलं योगदानं महत्त्वाचं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री काही द्विपक्षीय बैठकांना उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

स्वातंत्र्यापासून भारताच्या हिताविरुद्ध रशियानं काहीही केलेलं नाही. पाश्चिमात्य देशांपेक्षा आशियाकडे रशियाचा कल अधिक आहे, असं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याविषयी रशियात राहणाऱ्या भारतीयांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. तिथे शिकणारी पुण्याची विद्यार्थिनी वैष्णवी म्हणाली…

**होल्ड - वैष्णवी**

**<><><><><>**

मेक्सिको इथे सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या दीपिका कुमारी हिला आज महिलांच्या रिकर्व्ह प्रकारात रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत चीनच्या ली जियामन हिने

सुवर्णपदक जिंकलं. तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत उपविजेतेपद पटकावण्याची दीपिकाची ही पाचवी वेळ आहे.